# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५**

## वित्त विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ३**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: जी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०४०, विक्री, व्यापार इत्यादींवरील कर**<br>**रूपये:- १३,२७,१६,६९,०००/-**<br>**श्री. सुनिल प्रभू** |
| (१) | ३०६ | १०० | मुंबईच्या क्षेत्रीय केंद्रीय जीएसटी विभागाने बनावट जीएसटीच्या देयकाच्या आधारे १४० कोटी रुपयाची जीएसटी करचोरी उघडकीस आणून या प्रकरणी मीरा रोड येथून कपाडीया मोहम्मद सुलतान या आरोपीस मीरा रोड पोलीसांनी अटक केल्याची घटना घडणे. सदर प्रकरणी पोलीसांनी केलेल्या तपासात सुरुवातीला २६.९२ कोटी रुपयाची जीएसटी कर चोरी केल्याचे आढळून येणे, त्यासंबंधी अधिक तपास केला असता मुख्य आरोपी सुलतान हा १८ बनावट कंपन्यांच्या नावे देयक तयार करुन जीएसटीचा परतावा घेत असल्याची धक्कादायक माहिती उघड होणे. अशा बनावट परताव्यांचा आकडा १४० कोटी रुपये इतका असणे. आरोपी सुलतान यांनी आधारकार्ड, पॅनकार्ड सह अन्य दस्तावेजांचा गैरवापर करुन हे कार्ड विविध व्यक्तींच्या नावे असणे. त्यांच्या नावे बनावट कंपन्या उघडून जीएसटीचा परतावा स्वताच्या बँक खात्यात घेऊन आर्थिक घोटाळा करण्यात येत असणे. सदरहू आर्थिक घोटाळा प्रकरणात मोहम्मद सुलतान यास पोलीसांनी अटक करणे परंतु या प्रकरणातील संबंधित दोषी आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (२) | ४४१ | १० | राज्यात वस्तु व सेवाकर सन २०१७ पासून लागू केला असणे, राज्यात एक समानकर प्रणाली लागू केली असणे, मिरा रोड, जिल्हा ठाणे येथे वस्तु व सेवाकराची चोरी करीत असल्याचे माहे फेब्रुवारी-२०२५ च्या दुसऱ्या आठवडयात शासनाच्या निदर्शनास आले असणे, सुरुवातील २६.९२ कोटी रुपयाची चोरी समोर आली असणे, श्री सुल्तान यांने अनेक बनावट कंपन्या तयार केल्या असणे, सदरच्या कंपन्याच्या नावे देयके तयार केली असणे, बनावट कंपन्याच्या नावे रु.१४० कोटी परतावा घेतला असणे मात्र शासनाने अद्याप चौकशी केली नसणे, यात संबंधित विभागाचे कर्मचारी व वरिष्ठ अधिकारी असल्याचे दिसून येत असणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मात्र शासनाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीच कार्यवाही केली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: जी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०७१, निवृत्तीवेतन व इतर सेवानिवृती लाभ**<br>**रूपये:- ५,९९,९१,३१,१६,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (३) | ५९४ | १० | राज्यात दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अंशतः टप्पा अनुदान प्राप्त व २००५ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या राज्यातील सुमारे १० हजार शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना व राज्यातील विविध विभागातील कर्मचाऱ्यांना सन १९८२ ची जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १९ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) वित्त विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई